16-03-2025-Dai-02ff_DH_PAN_28_04_2016-2.qxp 03/15/2025 11:53 PM Page 1





मडगाव : मोफत व्हायफाय सेवेचे उद्घाटन केल्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना विरोधी पक्षनेते युरी आलेमाव.

# कुंकळ्ळी मतदारसंघात मोफत वायफाय हॉटस्पॉट सेवेचे शुभारंभ

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि.१५ : कुंकळ्ळीचे आमदार युरी आलेमाव यांनी कुंकळ्ळी, चांदोर आणि माकाझना येथे मोफत सार्वजनिक वायफाय हॉटस्पॉट सेवेचा शुभारंभ केला.

आलेमाव म्हणाले की, लोकांशी सल्लामसलत केल्यानंतर या ठिकाणांची निवड करण्यात आली आहे, जेणेकरून विनामूल्य वाय-फाय हॉटस्पॉट अशा भागात असतील जेथे ते समुदायासाठी सर्वात फायदेशीर आणि सोयीस्कर असणार आहेत. या सेवेतून इंटरनेटचा उत्तम वापर करून विद्यार्थी शैक्षणिक संधी वाढवू शकतात. तसेच इतरांना जीवनात समृद्ध होण्यासाठी त्याचा लाभ होऊ शकतो. जेथे लोकांची चांगली वर्दळ असते आणि जिथे लोक बसून सेवेचा वापर करू शकतात, अशा ठिकाणांची आम्ही निवड केली आहे,' असे विरोधी पक्षनेते आलेमाव यांनी सांगितले.

जनतेने या सुविधांचा जबाबदारीने वापर करावा आणि समाजाच्या भल्यासाठी सकारात्मक योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. असे अनेक विद्यार्थी असतील ज्यांना हायस्पीड इंटरनेट परवडत नाही. त्यामुळे हे वायफाय हॉटस्पॉट त्यांना उपयुक्त ठरतील. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) सारखे तंत्रज्ञान बहुआयामी असले तरी त्याचे सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही परिणाम होऊ शकतात, हे आपण समजून घेतले पाहिजे. जे सकारात्मक आहे ते आम्ही निवडले पाहिजे आणि त्यानुसार आपल्या कारकिर्दीला आकार देण्याची गरज आहे,' असे आलेमाव यांनी नमूद केले. माहिती तंत्रज्ञानाबरोबरच अन्य विकासकामे सुरू असून, त्याला मंजुरी मिळाल्यानंतर ती कुंकळ्ळी मतदारसंघात सुरू केली जाईल, असे त्यांनी सांगितले.


**जाहीर सूचना**

तमाम लोकांना याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील येथे खाली दिलेल्या अनुसूचित वर्णिलेली मालमत्ता **श्री. अजय अंथोनी मेंडिस व त्यांच्या पत्नी** जे सदर अनुसुचित मालमत्तेचे हक्कदार व एकमेव मालक असल्याचा दावा करतात असलेल्या यांच्याकडून खरेदी करू इच्छितात.
कोणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, फर्म, भागीदारी, संस्था किंवा अन्य कोणतेही पक्ष यांना सदर अनुसुचित प्लॉट किंवा त्याच्या कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, धारणाधिकार (लायेन), गहाणवट, ट्रस्ट, चार्ज, वारसा, सह-मालकी, सुविधाधिकार (इजमेंट), बक्षिसी किंवा अन्य कोणत्याही व्यवहाराद्वारे कोणताही दावा असल्यास किंवा त्याविरुद्ध दावा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तराखेपासून पंधरा (15) दिवसांच्या आत सर्व कागदोपत्री पुराव्यासह सत्यप्रतींसह येथे खाली दिलेल्या पत्त्यावर खाली सही करणाऱ्याकडे ते लेखी सादर करावे अन्यथा सदर प्रस्तावित विक्रीवर कोणाचाही कोणताही दावा किंवा हरकती नाहीत असे गृहित धरले जाईल आणि अशा कोणत्याही दाव्याचा संदर्भ न ठेवता किंवा तो जमेस न धरता सदर विक्री पूर्ण केली जाईल आणि तसे काही दावे असल्यास, तो सोडून दिले आहेत असे गृहित धरले जाईल व त्यानंतर ते माझे अशीलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

**मालमत्ता अनुसूची**

ताळगाव गाव, तिसवाडी, इल्हास, गोवा च्या सर्व्हे क्र. 262-22 खाली आता सर्वेक्षित असलेल्या दोना पावला येथील 519 स्के. मी. क्षेत्रफळाच्या 519 असलेल्या प्लाट क्र. इ-17, ला सिटाडेल या जमीन मिळकतीचा संपूर्ण भाग.
**चतु:सीमा पुढीलप्रमाणे: पूर्वेस:**प्लाट क्र. इ-12, **पश्चिमेस:**प्लाट क्र. इ-18, **उत्तरेस:** चार मीटर रस्ता, **दक्षिणेस:**आठ मीटर रस्ता.

**दि. 15.03.2025** **ॲड. सिद्धार्थ जे. सामंत ॲडव्होकेट व नोटरी**
503-504, 5वा मजला, एडकॅन माईंडस्पेस, कांपाल ट्रेड सेंटरजवळ,
ताजच्या विवांतासमोर, कांपाल-पणजी, तिसवाडी-गोवा 403001.
ईमेल: samantadvocatesyahoo.com



**CHANGE OF NAME**

I **Mr. Anish Zafare Alam Ahmed** Permanent R/o H.No. 322 / 5, Valkini Colony No. 1, Uguem Sanguem, South Goa, Goa 403704, would like to change my name my name on Indian Passport bearing No. M9629139, File No. LK4078727250215, Date of issue 14 / 05 / 2015, Place of issue Lucknow, Change of Name from **ANIS** TO **ANISH ZAFARE ALAM AHMED.** Hereinafter in all my dealings and documents as above.



यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

**युनियन बँक ऑफ इंडिया, क्षेत्रीय कार्यालय गोवा, दुसरा मजला, जीवन विश्वास, एलआयसी बिल्डिंग, ईडीसी कॉम्प्लेक्स, पाटो, पणजी, गोवा 403001**

**भाडेपट्ट्यावर कार्यालयीन जागा पाहिजे**

युनियन बँक ऑफ इंडियाला मडगाव शहरात मडगाव शाखेसाठी गोसालिया बिल्डींगजवळ प्राधान्याने तळमजल्यावरील जागा भाडेपट्ट्यावर लगेच ताब्यात घेता येईल अशा चांगल्या बांधकाम केलेल्या कमर्शियल जागा पाहिजेत. सदर कार्यालयीन जागा पुरेशा वाहनतळासह कमर्शियल वापरासाठी मंजुरित असाव्यात आणि मुख्य रस्त्यापासून सहज दिसतील असा असाव्यात व त्यांचे चटई क्षेत्र1850±10% स्क्वेअर फूट ते2040 स्क्वेअर फूट असावे.
निविदा प्रपत्रात तांत्रिक बोली व आर्थिक बोलीच्या नमुन्यांसह तपशीलवार अटी व शर्ती उपलब्ध आहेत. योग्य जागा किंवा मालमत्तांचे मालक/प्रतिनिधी यांनी खाली दिलेल्या पत्त्यावर असलेल्या आमच्या क्षेत्रीय कार्यालयातून निविदा प्रपत्रे **31.03.2025** रोजी दुपारी **12.30** पर्यंत कार्यालयीन वेळेत घ्यावीत.
**युनियन बँक ऑफ इंडिया, क्षेत्रीय कार्यालय गोवा, दुसरा मजला, जीवन विश्वास, एलआयसी बिल्डिंग, ईडीसी कॉम्प्लेक्स, पाटो, पणजी, 403001**
तसेच सदर निविदा प्रपत्रे बँकेच्या **www.unionbankofindia.co.in** या संकेतस्थळावरून व **www.eprocure.gov.in** या ई-प्रोक्युअरमेंट पोर्टलवरून डाऊनलोड करता येतील. सीलबंद लखोट्यातील तांत्रिक बोली आणि स्वतंत्र सीलबंद लखोट्यातील दर वा किंमत बोली क्षेत्रीय कार्यालय, गोवा येथे **31.03.2025** रोजी दुपारी **1.00** पर्यंत वा त्यापूर्वी सादर कराव्यात. तांत्रिक बोली **31.03.2025** रोजी दुपारी **1.30** वाजता उपस्थित बोलीदार /अधिकृत प्रतिनिधींच्या समक्ष उघडल्या जातील.
**टीप** : त्यासाठी कोणतेही कारण न देता एखादी वा सर्व बोली फेटाळण्याचा अधिकार या बँकेने राखून ठेवला आहे.

**दिनांक : 17.03.2025**
**ठिकाण: पणजी, गोवा** **क्षेत्रीय प्रमुख**



यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

**यूनियन बैंक ऑफ इंडिया ,क्षेत्रीय कार्यालय गोवा, द्वितीय तल ,जीवन विश्वास एलआईसी भवन ,ईडीसी कम्पलेक्स पाटो,पणजी , गोवा-403001**

**लीज पर परिसर की आवश्यकता**

यूनियन बैंक ऑफ इंडिया को मडगांव शहर मे मडगांव शाखा के लिए गोसालिया बिल्डिंग के समीप पूर्णतया निर्मित/तुरंत कब्जे के लिए तैयार व्यवसायिक परिसर जो भूतल पर हो लीज हेतु आवश्यकता है। परिसर का कार्पेट एरिया **1850 ± 10%** एस फीट से अधिकतम 2040 एस फीट हो। परिसर स्थान पार्किंग युक्त एवं सक्षम प्राधिकारी द्वारा वाणिज्यिक उपयोग हेतु स्वीकृत एवं मुख्य सड़क से दृश्य हो।
तकनीकी निविदा / वित्तीय निविदा से संबन्धित वस्तृत नियम व शर्तें प्रारूप के साथ निविदा दस्तावेज़ में उपलब्ध हैं। अनुकूल परिसर अथवा संपत्ति के स्वामित्व वाले व्यक्ति/प्रतिनिधि नीचे दिये गये पते पर क्षेत्रीय कार्यालय, गोवा से दिनांक **31.03.2025** दोपहर **12:30 बजे** तक कार्यालय अवधि के दौरान तकनीकी निविदा प्रारूप प्राप्त कर सकते है।
**यूनियन बैंक ऑफ इंडिया ,क्षेत्रीय कार्यालय गोवा,द्वितीय तल ,जीवन विश्वास एलआईसी भवन ,ईडीसी कम्पलेक्स ,पाटो ,पणजी , गोवा -403001**
वैकल्पिक निविदा दस्तावेज़, प्रारूप के साथ बैंक की वेबसाइट **www.unionbankofindia.co.in** व ई प्रॉक्यूरमेंट पोर्टल **www.eprocure.gov.in** से भी डाउनलोड किया जा सकता है। तकनीकी निविदा एक मुहरबंद लिफाफे में तथा मूल्य निविदा अलग मुहरबंद लिफाफे में दिनांक **31.03.2025** सांय **13:00 बजे** तक उपरोक्त पते पर जमा किया जा सकता है। तकनीकी निविदा दिनांक **31.03.2025** को सांय **13:30 बजे** उपरोक्त पते पर खोली जायेगी।
**नोट:** बैंक बिना किसी कारण बताए किसी भी या सभी निविदाओं को अस्वीकार करने का अधिकार सुरक्षित रखता है।
**दिनांक: 17.03.2025**
**स्थान: पणजी गोवा** **क्षेत्र प्रमुख**


# स्विमिंग झोन विभाग तेंबवाडा किनारी स्थलांतरित करणार

## आमदार जीत आरोलकर यांची ग्वाही : विठ्ठलदासवाडा किनारी भागात स्विमिंग झोनमुळे मासेमारी अडथळा

टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. १५ : सरकारने विठ्ठलदास वाडा किनारी भागात स्विमिंग झोन विभाग जाहीर करून त्या ठिकाणी फ्लोटिंग बॉल दोर घातलेले आहेत. त्या जागेमध्ये मच्छीमार व्यावसायिकांना पारंपरिक पद्धतीने मासेमारी करताना अडथळा येत आहे. यासंबंधी मच्छीमार व्यावसायिकांनी मांद्रेचे आमदार जीत आरोलकर यांच्याकडे तक्रार केल्यानंतर शनिवारी त्यांनी जागेची पाहणी केली व तो विभाग विठ्ठलदास वाड्यावरून तेंबवाडा किनारी भागात नेला जाईल, असे आश्वासन आमदार आरोलकर यांनी दिले. विठ्ठलदासवाडा मोरजी किनारी भागात स्थानिक मच्छीमार व्यावसायिक आणि जीवन रक्षकांच्या अधिकाऱ्यांसोबत त्यांनी चर्चा केली.

विठ्ठलदास वाडा मोरजी समुद्रकिनारी भागात सरकारने स्विमिंग झोन जाहीर करून त्या ठिकाणी फ्लोटिंग बॉल दोर ठीकठिकाणी घातलेले आहेत आणि ही जागा पोहण्यासाठी ज्या पद्धतीने सुरक्षित आहे. तशीच मासेमारी ही पारंपरिक पद्धतीने करण्यासाठी सुरक्षित असल्याने, मच्छीमार व्यवसायिकांना भविष्यात याचे मोठ्या प्रमाणात अडथळे होऊ शकतात. त्यामुळे येथील झोन इतरत्र हलवावा, अशी जोरदार मागणी मागच्या दोन दिवसांपूर्वी स्थानिक मच्छिमार बांधवांनी केली होती.



मोरजी : स्विमिंग झोनची पाहणी केल्यानंतर मच्छिमार व्यावसायिक यांच्याशी चर्चा करताना आमदार जीत आरोलकर.

त्याचपार्श्वभूमीवर आमदार जीत आरोलकर यांनी मच्छीमार बांधवांची भेट घेऊन त्यांच्याकडे चर्चा केली. त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या आणि त्यांनाही सूचना करताना पारंपरिक पद्धतीचा मच्छीमार व्यवसाय करताना कसल्याचप्रकारचा भवितव्यात अडथळे निर्माण होणार नाही. परंतु पर्यटकांना पोहण्यासाठी जागा ही सुरक्षित असणे आवश्यक आहे. त्यामुळे सरकारने प्रत्येक किनाऱ्यावर स्विमिंग झोन तयार केलेला आहे आणि त्यात परिसरात हे पर्यटक आंघोळीसाठी जातील, असे आमदार जीत आरोलकर यांनी सांगून विठ्ठलदास वाडा किनारी भागातील स्विमिंग झोन तेंबवाडा परिसरात हलवण्यात येईल, असे सांगितले.

स्थानिक मच्छिमार बांधवांनी माहिती देताना सांगितले की, पूर्वजापासून आमचे व्यवसाय या किनाऱ्यावर आहेत. स्थानिक मच्छीमारी बांधव पारंपरिक पद्धतीने व्यवसाय करत असतात. पावसाळ्यात किनाऱ्यावर प्याग्यार वेणीद्वारे मासेमारी करत असतात. इतर हंगामात छोट्या-छोट्या होड्याद्वारे पारंपरिक पद्धतीने मासेमारी केली जाते आणि त्याचठिकाणी किनाऱ्यावर स्विमिंग झोन करून पारंपरिक व्यावसायिकांना अडथळे निर्माण करण्याचा सरकारचा डाव योग्य नाही. फ्लोटिंग बॉल दोरी घालत असताना तत्पूर्वी स्थानिक मच्छिमार व्यावसायिकांना पूर्वकल्पना द्यायची होती. तीही सरकारने दिलेली नाही. निदान आमदाराने तरी आम्हाला न्याय द्यावा. त्यासाठीच आम्ही या स्विमिंग झोनसाठी विरोध दर्शवला होता. परंतु, या ठिकाणचा स्विमिंग झोन हलवून तो इतरत्र आमदार जीत आरोलकर यांनी करण्याची ग्वाही दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो, असे स्थानिक मच्छीमार व्यावसायिक हणाले

# शैक्षणिक लेखन कौशल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा समारोप

## साखळी सरकारी महाविद्यालयातील हिंदी आणि ग्रंथालय विभागातर्फे आयोजन

टीम दैनिक हेराल्ड

पर्वरी, दि.१५ : कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळी येथील हिंदी (युजी आणि पिजी), हिंदी संशोधन केंद्र आणि ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक लेखन कौशल्य : योग्य संदर्भ, उद्धरण आणि साहित्यिक चोरी प्रतिबंध या विषयावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. या अभ्यासक्रमासाठी एकूण ४८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला होता. हिंदी विभागाच्या प्रमुख डॉ. सोनिया सिरसाट आणि महाविद्यालयाचे ग्रंथपाल समीर फट्टे हे या अभ्यासक्रमाचे मुख्य समन्वयक होते. दि. ५ मार्च रोजी या अभ्यासक्रमांचा समारोप सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांचे मनोगत झाले. पणजी येथील शारदा मंदिर शाळेच्या अध्यापिका अंकिता हळर्णकर, एम.ए.भाग दोनच्या विद्यार्थिनी संध्या शर्मा, एम.ए. हिंदी भाग एकच्या विद्यार्थी प्रवीण बुरंगे यांनी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाबद्दलची मते व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रियंका चव्हाण यांनी केले. तर आभार समीर फट्टे यांनी मानले.

या प्रमाणपत्र अभ्यासक्रमामध्ये गोवा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट साखळीचे ग्रंथपाल डॉ. तकाप्पा आर, डॉन बास्को कॉलेज ऑफ इंजिनियरिंग,ातोर्डा गोवाचे ग्रंथपाल डॉ.ान्सिस्को रोलँड रॉड्रिग्ज दा क्रूझ, नारायण झांट्ये कॉलेज ऑफ कॉमर्सचे ग्रंथपाल डॉ. बाळा मांद्रेकर, विद्याप्रबोधिनी कॉलेज ऑफ कॉमर्स एज्युकेशन, कम्प्युटर अँड मॅनेजमेंट आल्त पर्वरीचे ग्रंथपाल डॉ. नितेश नाईक, कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळीचे ग्रंथपाल समीर फट्टे आदी मान्यवर तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**विद्यार्थी आव्हानांचा मुकाबला सहजपणे करणार**

जलदपणे विकसित होत असलेल्या शैक्षणिक जगात संदर्भ आणि पुरावे देऊन प्रभावीपणे लेखन करणे हे एक कौशल्य नाही तर काळाची गरज आहे. ही गरज ओळखून शैक्षणिक लेखन कौशल्ये : योग्य संदर्भ, उद्धरण आणि साहित्यिक चोरी प्रतिबंध या विषयावरील हा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे आयोजन केलेले होते. या अभ्यासक्रमामुळे भविष्यातील कोणत्याही आव्हानांचा मुकाबला विद्यार्थी सहजपणे करू, शकतात, असे उद्गार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांनी काढले. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमातून लेखन विषयक कौशल्ये आत्मसाद करून विद्यार्थी नक्कीच यश मिळवतील असा आत्मविश्वासही त्यांनी व्यक्त केला.

पान १ वरून

# वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर ३ ठिकाणी पिण्याचे पाणी पुरवा

देखील स्थापित केल्या जातील. पहिल्या टप्प्यासाठी तीन मोक्याची ठिकाणे नमूद केली असून त्यात पणजी म्युनिसिपल मार्केट कॉम्प्लेक्स, इमॅक्युलेट कन्सेप्शन चर्चजवळील सार्वजनिक शौचालय आणि पणजी बस स्टँडजवळील एसबीएम शौचालय यांचा समावेश आहे. ही ठिकाणे त्यांच्या उच्च पादचाऱ्यांच्या रहदारी आणि विद्यमान पायाभूत सुविधांमुळे निवडली गेली. विद्यमान सार्वजनिक शौचालयांचे रेट्रोफिटिंग करून, हा उपक्रम महागड्या स्वतंत्र पायाभूत सुविधांची आवश्यकता टाळतो आणि सुरक्षित पिण्याच्या पाण्याची समान उपलब्धता सुनिश्चित करतो. दीर्घकालीन देखभालीला समर्थन देणाऱ्या स्थानिक व्यवसाय आणि कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) उपक्रमांसह सार्वजनिक-खाजगी भागीदारीची शक्यता देखील संस्थेला दिसते. शहरी सार्वजनिक जागांमध्ये सुरक्षित पिण्याच्या पाण्याची समान उपलब्धता सुनिश्चित करणे ही एक मूलभूत गरज आहे, असे नाईक म्हणाले. ही रणनीती विद्यमान नगरपालिका पायाभूत सुविधांचा फायदा घेते, खर्च कमी करते आणि जलद अंमलबजावणी सुनिश्चित करते. संस्थेने क्षेत्रीय मूल्यांकन केले आहे आणि समस्येची रूपरेषा आणि प्रस्तावित उपायांसाठी माहिती पत्रक आणि एक लहान व्हिडिओसह तपशीलवार साहित्य तयार केले आहे. या उपक्रमाला प्रत्यक्षात आणण्यासाठी ते नगरपालिका अधिकारी, धोरणकर्ते, व्यवसाय आणि नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन संस्थेने केले आहे.



शिवोली : राय येथे स्मार्ट बसस्टॉपचे उद्घाटन करताना आमदार डिलायला लोबो. सोबत सरपंच संदेश हडफडकर व इतर.

# स्मार्ट बस स्टॉपचे शिवोलीत उद्घाटन

टीम दैनिक हेराल्ड

शिवोली, दि. १५ : गेल्या काही दिवसांपासून शिवोली परिसरात अनेक विकासकामे मार्गी लागलेली आहेत. पुढील काही दिवसातही अन्य विकासकामे पूर्ण होणार असून निवडणुकीत दिलेली अनेक आश्वासने पूर्ण केली जात असल्याचे आमदार डिलायला लोबो यांनी सांगितले.

राय शिवोली येथे स्मार्ट बस स्टॉपचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आमदार लोबो, सरपंच संदेश हडफडकर, पंचसदस्य तथा माजी सरपंच शर्मिला वेर्णेकर, अभय शिरोडकर, फेर्मिना फर्नांडिस, पंचसदस्य व माजी उपसरपंच विलियम फर्नांडिस, पंचसदस्य अमित मोरजकर व ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्मार्ट बस स्टॉप स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी सर्वांची आहे. यासाठी स्थानिक पंचांनी लक्ष ठेवणे गरजेचे आहे. या स्मार्ट बस स्टॉप वरील मोबाईल रिचार्ज सेवेचा जनतेने फायदा करून घ्यावा. उद्घाटन केलेल्या स्मार्ट बस स्टॉप वर लवकरच सीसीटीव्ही कॅमेरा व इंटरनेट सेवा उपलब्ध केली जाणार असल्याचे सरपंचांनी स्पष्ट केले. स्थानिक पंचसदस्य व माजी सरपंच शर्मिला वेर्णेकर यांनी आभार व्यक्त केले.



बांदा : पत्रादेवी-बांदा रोड येथे जप्त केलेल्या मुद्देमाल व संशयितासह राज्य उत्पादन शुल्क तपासणी नाका इन्सुली पथकाचे अधिकारी व कर्मचारी (आशुतोष भांगले)

# बांदा पत्रादेवी मार्गावर सव्वा तीन लाखांची अवैध दारू जप्त

टीम दैनिक हेराल्ड

बांदा, दि. १५ : राज्य उत्पादन शुल्क, तपासणी नाका इन्सुली पथकाने अवैधरित्या गोवा बनावटीची दारुची वाहतूकप्रकरणी ३ लाख २५ हजार २०० किंमतीची दारू व चारचाकी वाहनासह १३ लाख २५ हजार २०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी रत्नागिरी येथील चालकाला ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई शुक्रवारी सायंकाळी उशिरा जुना पत्रादेवी-बांदा रोड, पंजाबी ढाब्याजवळ करण्यात आली.

इन्सुली कार्यालयातून मिळालेली अधिक माहिती अशी की, राज्य उत्पादन शुल्क, सिंधुदुर्ग अधीक्षक, मनोज शेवरे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य उत्पादन शुल्क, तपासणी नाका इन्सुली पथकाने मिळालेल्या गोपनीय बातमीनुसार जुना पत्रादेवी-बांदा रोड, पंजाबी ढाब्याजवळ, बांदा येथे शुक्रवारी संध्याकाळी उशिरा अवैधरित्या गोवा बनावटीच्या दारु वाहतुकीच्या संशयीत वाहनांची तपासणी करीत असताना या वाहनाची तपासणी केली असता वाहनाच्या पाठीमागील सीटवर व डिकीमध्ये गोवा बनावटीच्या विदेशी दारुच्या विविध ब्रॅन्डचे ४२ बॉक्स अवैध मद्यसाठा मिळून आला. सदर प्रकरणी वाहन चालक प्रथमेश दिपक भाटकर(वय २९ वर्षे रा. तवसाळ, ता. गुहागर, जि. रत्नागिरी) यास मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले. यामध्ये ३ लाख २५ हजार २०० किंमतीचे दारु व रु. १० लाख किंमतीचे चारचाकी वाहन असा एकुण १३ लाख २५ हजार २०० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर कारवाई निरीक्षक भानुदास खडके, दुय्यम निरीक्षक प्रदीप रासकर, विवेक कदम, धनंजय साळुंखे, जवान नि. वाहन चालक रणजीत शिंदे, जवान दिपक वायदंडे, जवान सागर सुर्यवंशी,जवान अभिषेक खत्री यांनी केली.

पुढील तपास दुय्यम निरीक्षक तपासणी नाका इन्सुली प्रदीप रासकर हे करीत आहेत.

# डिचोलीत २० रोजी शिमगोत्सव मिरवणूक

## बक्षिसांची खैरात : पत्रकार परिषदेत कार्यक्रम जाहीर

टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. १५ : गोवा सरकारचे पर्यटन खाते व डिचोली शिमगोत्सव समितीतर्फे यावर्षी २० मार्च रोजी भव्य शिमगोत्सव मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून त्यानिमित्त चित्र रथ, रोमटा मेळ,लोकनृत्य, वेशभूषा आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आयोजन समितीचे अध्यक्ष आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, उपाध्यक्ष नेहल तळा व वणेकर गुंजन कोरगावकर, रामा परब शंकर बेतकीकर, राजन कडकडे आदिंनी पत्रकार परिषदेत दिली.

शिमगोत्सवानिमित्त भव्य बक्षिसांची खैरात करण्यात आली असून स्पर्धेसाठी विविध नियमावली वेळेचे बंधन घालण्यात आलेले आहे. त्यामुळे सर्व पथकांनी नियमांचे योग्य पालन करून मोठ्या संख्येने या उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आलेले आहे.

वर्षपद्धतीप्रमाणे ठरलेल्या रूट



डिचोली : पत्रकार परिषदेत माहिती देताना आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, गुंजन कोरगावकर, राजन कडकडे, रामा परब, शिवराम फळारी, शंकर बेतकीकर, गुंजन कोरगावकर, रोहिदास पळ, रोहन शिरोडकर व इतर.

वरून मिरवणूक काढण्यात येणार असून साडे चार वाजता वडाचा वाडा बोर्डे येथून मिरवणुकीला सुरुवात होईल, अशी माहिती देण्यात आली. तसेच वेशभूषा स्पर्धा तालुका मर्यादित छोटा गट पाच ते दहा मोठा गट ११ ते १८ होणार असून ही स्पर्धा २० मार्च छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर सायंकाळी पाच वाजता घेण्यात येणार असल्याची माहिती वेशभूषा प्रमुख राजन कडकडे यांनी दिली.

सचिव पांडुरंग कोरगावकर यांनी स्पर्धेतील बक्षिसांची रक्कम जाहीर केली. चित्र स्पर्धेतील विजेत्या पथकास ८० हजार, ४५000, ३५000, २५000, २0000, दहा हजार व उत्तेजनार्थ १३ पथकांना प्रत्येकी ५000 बक्षीस देण्यात येईल.

रोमटामेळ स्पर्धेत विजेत्यांना रुपये ४५000, ३0000, २५000, दहा हजार, नऊ हजार, पाच हजार व उत्तेजनार्थ सहा बक्षिसे प्रत्येकी ४000 देण्यात येतील. लोकनृत्य स्पर्धेतील विजेत्यास २0000, १५000, दहा हजार, आठ हजार, पाच हजार,

उत्तेजनार्थ सहा बक्षिसे प्रत्येकी चार हजार देण्यात येतील. वेशभूषा स्पर्धेत खुल्या गटात सात हजार, पाच हजार, चार हजार, तीन हजार, एक हजार रुपये, उत्तेजनार्थ चार प्रत्येकी एक हजार, वेशभूषा खुला गट, वेशभूषा स्पर्धा, छोटा गट डिचोली तालुका मर्यादित वेशभूषा स्पर्धा मोठा गट डिचोली तालुका मर्यादित आदींना बक्षिसे देण्यात येतील. सर्व पथकांच्या स्पर्धेच्या ठिकाणी २0 रोजी सायंकाळी साडेचार वाजेपर्यंत हजर राहणे बंधनकारक आहे. तसेच अटी व नियमांचे पालन करावे, असे आवाहन आयोजकांनी केलेले आहे. २४ रोजी वर्तमानपत्रातून जाहीर करण्यात येतील. या उत्सवास मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहावे व या मिरवणुकीचा आनंद लुटावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

यावेळी विविध समित्यांची निवड करण्यात आली. डिचोली शिमगोत्सव समितीच्या अध्यक्षपदी डॉ. चंद्रकांत शेट्ये, उपाध्यक्षपदी विजयकुमार नाटेकर, नेहल तळावणेकर, दीपा पळ, सचिवपदी पांडुरंग कोरगावकर, खजिनदारपदी रामा परब यांची तर कार्यक्रम प्रमुख शंकर बेतकेकर, सहखजिनदार गोविंद परवार यांची निवड केली आहे.

शिवराम फळारी, गुरूदास गावडे यांची रोमटामेळ प्रमुखपदी, चित्ररथ प्रमुख, तुषार मांद्रेकर यांची, लोकनृत्य प्रमुख रोहन शिरोडकर, वेशभूषा स्पर्धा राजन कडकडे,रोहिदास पळ, रुद्रेश चणेकर यांची, तर व्यासपीठपदी अनिकेत चणेकर अल्पोपहार रंजना वायंगणकर प्रसिद्धी प्रमुख तुकाराम सावंत, फेटे प्रमुख निखिल दीक्षित यांची निवड करण्यात आली आहे.

सल्लागार समितीवर गौरीश गावठणकर, नरेश कडकडे, बाबी पळ, विजेंद्र गोवेकर, विस्मय प्रभू देसाई, श्याम मातोंडकर, प्रदीप रेवडकर,कौस्तुभ पाटणेकर, राजाराम गावकर, रामानंद नाटेकर तसेच सदस्यपदी दीपा शिरगावकर, सुखदा तेली, निलेश टोपले, अपर्णा फोगेरी, रियाज बेग, तनुजा गावकर, पुंडलिक फळारी, सुदन गोवेकर यांची निवड करण्यात आलेली आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.